महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग - दोन

गुरुवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ / कार्तिक ४, १९४५ शके

लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

१३२. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली असून एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता प्रलंबित १४८ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६१ निवेदने गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. एकूण ८७ निवेदनांपैकी ५३ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ५८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ३४ निवेदनांपैकी ०६ निवेदने दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ६० अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. एकूण २८ निवेदनांपैकी ०५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ७३ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. तसेच प्रलंबित २३ निवेदनांपैकी ४ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. तसेच प्रलंबित १९ निवेदनांपैकी ०६ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२० अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. उर्वरित एकूण १३ प्रलंबित निवेदनांपैकी ०२ निवेदने दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे क्रमांक १२४ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ११ प्रलंबित निवेदनांपैकी ०५ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२३.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव - १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना क्र.४१६

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. दिलीप लांडे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे तांभाड,ता. भोर जि.पुणे येथील डोंगरावर अनेक विकासकांनी डोंगर उतार फोडून, उत्खनन करुन शासनाच्या नियमांचे उल्लंख्न करुन मोठया प्रमाणात हॉटेल, रिसॉट, व बंगले बांधले असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ च्या तिस-या आठवडयात वा त्या दरम्यान उघडकीस आलेली असणे, या उत्खननामुळे राष्ट्रीय नैसर्गिक साधन संपत्तीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असून शासकिय नियम पायदळी तुडविले जात असणे, या अवैध उत्खननामुळे तांभाड गावाचे माळीण,कात्रट घाट यासारख्या दुर्धटना होण्याची दाट शक्यता असून मोठया प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होण्याची शक्यता असणे, परिणामी या अवैध डोंगर गाव या उत्खनन त्वरित थांबवून येथे बांधण्यात आलेल्या अनधिकृत हॉटेल, रिसॉर्ट व बंगल्याचे बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता, व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे तांभाड, ता. भोर, जि.पुणे येथील ग.नं. ७९८/ १२६१, ८०९/१२५९ मधील रस्त्याचे कामासाठी परवानगी पेक्षा ४० ब्रास जास्तीचे गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे आढळून आल्याने तहसिलदार, भोर यांनी संबंधिता विरूध्द् महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी अन्वये दिनांक ०६.०६.२०२२ च्या आदेशान्वये रुपये २,०३,६००/- एवढ्या दंडात्मक कारवाई करण्यात येवून सदर रक्कम शासन जमा करण्यात आली आहे. तसेच, गट नं.८०९/१२७२ मधील रस्त्यासाठी अवैधरित्या १०० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे आढळून आल्याने संबंधिताविरूध्द तहसिलदार, भोर यांनी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीनुसार रू. ५,०९,०००/- एवढ्या दंडात्मक रकमेची कारवाई करून संबंधीताच्या मिळकतीवर बोजा दाखल केला आहे.

तर गट नं. ७९८/ १२६१,८०९/१२७२, ७९६/१२५९ मध्ये संबंधीतांनी ९४४.८८ चौ.मी. विनापरवाना बांधकाम केल्याच्या अनुषंगाने तहसिलदार, भोर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ अन्वये संबंधिताविरुध्द रू. ४०२३.८३ एवढ्या रकमेची अनधिकृत बिनशेती वापराच्या दंडाबाबत दिनांक २१.०४.२०२२ रोजी आदेश पारीत केले.

सदर दंडाची रक्कम संबधीतांनी भरणा न केल्याने संबधीताच्या गा.नं.न. ७/१२ बोजा नोंदविण्यात आला आहे. तसेच तहसिलदार, भोर यांनी संबधित अनाधिकृत बांधकाम धारक यांना अनाधिकृत बांधकाम काढण्यास व जमीनीचा वापर मुळ प्रयोजनाकडे करण्याबाबत नोटीसा देण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र.२०१६

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र २०१६ पुढील प्रमाणे आहे:-

**"उरमोडी प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या गावांचे पुर्नवसन करत असताना जुन्या गावांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासंदर्भातील शासन परिपत्रक क्र. आरपीए. 0410/प्र.क्र. 153/2- मंगल दि. 14/05/2010 रद्द होणेबाबत सातारा मतदार संघातील उरमोडी प्रकल्पातील मोखोल कारस्थल बनगर, त्रिल आणि काही यु ॥ गावातील 100 टक्के बुडीत क्षेत्रात होणाऱ्या खातेदार पुर्नवसनाची प्रक्रिया पूर्ण झालेली नसताना सुध्दा 2009 साली आपली घरे-दारे मोडून आपापल्या जागेत स्वखचनि गावठाण तयार करून प्रकल्पग्रस्त घरे बांधून राहत आहेत. परंतु या वर सरकून राहात असलेल्या गावातील धरणग्रस्ताना विचारात न घेता शासनाने विषयांकित परिपत्रक दि. 14/05/2010 रोजी काढून गावाना कोणत्याही सुविधा देवू नयेत असे प्रशासनास कळवून धरणग्रस्तांना प्राथमिक विकासापासून वंचित ठेवले असणे, तरी वर सरकून राहणाऱ्या धरणग्रस्त गावांच्या अडीअडचणींचा विचार होवून त्यांना नागरी सुविधा मिळण्यासाठी विषयांकित दि. 14/05/200 चे शासन परिपत्रक रद्द करण्याची स्थानिक नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधीकडून मागणी होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"**

---

**मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन:-**

उरमोडी प्रकल्पामुळे बाधित होणा-या मौजे लुमणेखोल, कासारस्थळ, बनघर, निवळ, कातवाडी बु, वेणेखोल या गावातील प्रकल्पग्रस्त खातेदार यांचे महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ मधिल तरतूदीनुसार पुनर्वसन करुन त्यांना पर्यायी जमिन व पुनर्वसित गावठाणामध्ये रहिवासी भूखंडाचे वाटप तसेच नागरी सुविद्याही पुरविण्यात आलेल्या असतानाही सदर गावातील प्रकल्पग्रस्त पुनर्वसित गावठाणामध्ये स्थलांतरण करुन राहण्यास गेले नाहीत. महसूल व वन विभाग परिपत्रक क्र आरपीए-०४१०/प्र.क्र.१५३/र-१, दि १४.०५.२०१० अन्वये दिलेले निर्देश हे पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील जुन्या गावठाणात नागरी सुविद्या पुरतेच मर्यादित असुन मौजे लुमणेखोल, कासारस्थळ, बनघर, निवळ, कातवाडी ब या बाधित गावठाणातील बाधित कुटूंब धरणाच्या लगत वरील बाजूस राहत असुन सदर बाधित कुटूंब प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील जुन्या गावठाणात राहत नसल्याने सदर परिपत्रकातील निर्देशामुळे उक्त गावठाणास नागरी सुविद्या पुरविण्याबाबत कोणतीही बाधा नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यानुसार उक्त परिपत्रक रद्य करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करणे अभिप्रेत नाही. बाधित क्षेत्रामध्ये बनघर, कासारस्थळ, नित्रळ हे पुर्णत: बाधीत तर वैणेखोल व कातवडी बु. ही अंशत: बाधीत गावे आहेत. सदर बाधित गावठाणाचे पुनर्वसन करण्यासाठी निर्माण केलेल्या नवीन गावठाणांत नागरी सुविधांची कामे पूर्ण आहेत; परंतु प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले नाहीत. रहाटणी कासारस्थळ (ताखटाव) येथील नागरी सुविधा पुर्ण होऊन प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले आहेत.

९२३



अंशतः बाधीत गावठाण मौजे वेणेखोल, ता. जि. सातारा येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुळ नियोजनात बदल करून मौजे म्हसवड, ता. माण, जि. सातारा येथे करण्यास तसेच त्यासाठी मौजे- म्हसवड, ता. माण, जि. सातारा येथील १३९.५४ हे. आर जमीन संपादन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर गावातील प्रकल्पग्रस्तांना प्राथमिक विकासापासून वंचित ठेवले, ही बाब खरी नाही.

लुमणेखोल या बाधित गावठाणाचे पुनर्वसन मौजे चोराडे, ता खटाव येथे करण्यात आले असुन पुनर्वसित गावठाणामध्ये १८ नागरी सुविद्या पुरविण्यात आल्या आहेत. कासारस्थळ या बाधित गावठाणाचे पुनर्वसन मौजे रहाटणी, ता. खटाव येथे करण्यात आले असुन पुनर्वसित गावठाणामध्ये १७ नागरी सुविद्या पुरविण्यात आल्या आहेत. कातवडी बु. या बाधित गावठाणाचे पुनर्वसन मौजे पळशी, ता. माण येथे करण्यात आले असुन पुनर्वसित गावठाणामध्ये १४ नागरी सुविद्या पुरविण्यात आल्या आहेत. बनघर या बाधित गावठाणाचे पुनर्वसन मौजे म्हासुर्णे, ता. खटाव येथे करण्यात आले असुन पुनर्वसित गावठाणामध्ये १७ नागरी सुविद्या पुरविण्यात आल्या आहेत. निवळ या बाधित गावठाणाचे पुनर्वसन मौजे म्हासुर्णे व चितळी, ता. खटाव येथे करण्यात आले असुन पुनर्वसित गावठाणामध्ये १७ नागरी सुविद्या पुरविण्यात आल्या आहेत.

उरमोडी जलाशयामुळे ११ गावे पुर्णतः व १२ गावे अशतः बाधित होत आहेत. सदर गावाचे पुनर्वसन करणे करीता पुनर्वसन आराखडा महसूल खात्यामार्फत निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार बाधित गावांचे पुनर्वसन सातारा तालुक्यातील ५, खटाव तालुक्यातील १४ व माण तालुक्यातील ६ गावठाणामध्ये करणेचे नियोजन आहे. परंतु सद्यःस्थितीत माण तालुक्या मध्ये निगुडमाळ व म्हसवड (वेणेखोल) या दोन गावठाणाची जादा मागणी आहे. त्यामुळे माण तालुक्यात एकुण ८ गावठाणे होत आहेत. सद्यःस्थितीत १८ गावठाणातील नागरी सुविधा कामे पूर्ण झाली असून त्यापैकी १२ गावठाणातील नागरी सुविधा जिल्हा परिषदेकडे (संबंधित गाव कमिटीकडे) हस्तांतरीत केलेल्या आहेत. प्रकल्पग्रस्त जस जसे स्थलांतरीत होतील तसतसे इतर ७ गावातील नागरी सुविधांची कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन राज्य शासनाच्या महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ व राष्ट्रीय पुनर्वसन धोरण, २००७ नुसार करण्यात येते. प्रकल्पग्रस्तांचे दर्जेदार पुनर्वसन करण्याच्या दृष्टीकोनातून पुनर्वसन अधिनियम व केंद्रशासनाच्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणाची माहिती करुन देण्यासाठी यशदा, पुणे येथे दि. १३/०३/२०१० रोजी कार्यशाळा आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये असा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन करण्यासाठी नविन गावठाण निर्माण करण्यात येते व पुनर्वसित गावठाणात प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड वाटप करण्यात येतात व नविन गावठाणात महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार नागरी सुविधा पुरविण्यात येतात. नविन गावठाणात नागरी सुविधा पुरविल्यानंतर प्रकल्पग्रस्त जुन्या गावठाणातून स्थलांतरीत होत नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे जुन्या गावठाणामध्ये जिल्हा परिषदेकडून नागरी सुविधा पुरविल्या जातात. जुन्या

गावठाणात नागरी सुविधा पुरविल्या जात असल्याने प्रकल्पग्रस्त सहजासहजी त्या ठिकाणाहून स्थलांतरीत होत नाहीत. त्यामुळे पुनर्वसनाच्या कामावर त्याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे संबंधीत जिल्हा परिषदेने जुन्या गावठाणात नागरी सुविधांवर खर्च करु नये.

तसेच गावठाणाचे संपादन झाल्यानंतर त्या ठिकाणची ग्रामपंचायत बरखास्त करणे आवश्यक आहे. तसे न झाल्याने जुन्या गावठाणात तसेच नविन पुनर्वसित गावात स्वतंत्रपणे निवडणूका घेतल्या जातात या बाबत राज्य निवडणूक आयोगाने तीव्र आक्षेप घेतले आहेत. जुन्या गावठाणामध्ये तसेच नविन गावठाणामध्ये अशा दोन ठिकाणी ग्रामपंचायती न ठेवता नविन पुनर्वसित गावठाणातच ग्रामपंचायत स्थापन करुन त्याच ठिकाणी निवडणूका घ्याव्यात असे निर्देश महसूल व वन विभागाचे दि १४ मे, २०१० रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत.

पाटबंधारे प्रकल्पाच्या पूर्णत: बाधित व अंशत: बाधित क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण नविन पुनर्वसित गावठाणामध्ये होणेसाठी तसेच सदर प्रकल्पग्रस्तांचे कायमस्व्रुपी पुर्नवसन होणेसाठी या विभागाने परिपत्रक दि. १४/५/२०१० निर्गमित केलेले आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुर्नवसन होणेसाठी सदर परिपत्रक आवश्यक आहे.

---

गावठाणात नागरी सुविधा पुरविल्या जात असल्याने प्रकल्पग्रस्त सहजासहजी त्या ठिकाणाहून स्थलांतरीत होत नाहीत. त्यामुळे पुनर्वसनाच्या कामावर त्याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे संबंधीत जिल्हा परिषदेने जुन्या गावठाणात नागरी सुविधांवर खर्च करु नये.

तसेच गावठाणाचे संपादन झाल्यानंतर त्या ठिकाणची ग्रामपंचायत बरखास्त करणे आवश्यक आहे. तसे न झाल्याने जुन्या गावठाणात तसेच नविन पुनर्वसित गावात स्वतंत्रपणे निवडणूका घेतल्या जातात या बाबत राज्य निवडणूक आयोगाने तीव्र आक्षेप घेतले आहेत. जुन्या गावठाणामध्ये तसेच नविन गावठाणामध्ये अशा दोन ठिकाणी ग्रामपंचायती न ठेवता नविन पुनर्वसित गावठाणातच ग्रामपंचायत स्थापन करुन त्याच ठिकाणी निवडणूका घ्याव्यात असे निर्देश महसूल व वन विभागाचे दि १४ मे, २०१० रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत.

पाटबंधारे प्रकल्पाच्या पूर्णत: बाधित व अंशत: बाधित क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण नविन पुनर्वसित गावठाणामध्ये होणेसाठी तसेच सदर प्रकल्पग्रस्तांचे कायमस्त्रुपी पुर्नवसन होणेसाठी या विभागाने परिपत्रक दि . १४/५/२०१० निर्गमित केलेले आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुर्नवसन होणेसाठी सदर परिपत्रक आवश्यक आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र ८७४

## महाराष्ट्र विधानसभा

**श्रीमती ऋतुजा लटके, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र ८७४ पुढीलप्रमाणे आहे. :-**

**"अंधेरी पूर्व येथील पंपहाऊस सबवे वरिल पश्चिम द्रुतगती महामार्गावरील पुलाची दुरावस्था झाल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू पुलाच्या भितीला लोखंडी रेल्लींग हे संलग्न नसल्याने मधील जागा मोकळी राहत असणे, सदर मोकळया जागेमुळे तसेच अपूर्ण लोखंडी रेल्लीगमुळे हनुमान नगर ईर्ला ब्रिर्ज, एस व्ही रोड अंधेरी पश्शिचत येथे राहणारा तेजस्व वर्मा वयवर्षे २५ या तरूण मुलाची बाईक स्लीप होउन दिनांक ०४.१२.२०२२ रोजी झालेला अपघात, सदर अपघातात त्यांचा दिनांक ०५.१२.२०२२ रोजी ऑपरेशन दरम्यान झालेला मृत्यू, या पुलावर अशाप्रकारे लहान-मोठे झालेले अनेक अपघात, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकामध्ये तसेच वाहन चालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व संतापाचे वातावरण, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिनी संबंधिताशी केलेला पत्रव्यवहार, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालण्याची आवश्यकता, तसेच याठिकाणी अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याची नितांत गरज, याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"**

---

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

दिनांक ०३.१२.२०२२ रोजी या मार्गावर श्री तेजस वर्मा हे अॅव्हेंजर मोटर सायकल क्र एमएच ०२ सीएस ६३९४ ने जात असताना पंप हाऊस सबवे ब्रीजवर डाव्याबाजुने ओव्हर टेक करत असतना श्री तेजस वर्मा यांचे मोटर सायकलवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी बाजुच्या कठडयावरुन घसरत जाऊन रस्त्याच्या बाजुला पडली व मोटर सायकलस्वार रस्त्याच्या बाजुला असलेल्या लोखंडी कठड्याला धडकून सबवे ब्रीजवरुन खाली पडला जखमी अवस्थेत श्री तेजस वर्मा यांना कुपर हॉस्पीटलमध्ये भरती करण्यात आलेले होते. मोटर सायकलस्वाराच्या पाठीमागे बसलेला त्याचा मित्र श्री अदित्य भोलानाथ वर्मा यांचा जबाब पोलिसानी नोंदविलेला आहे. सदर घटनेबाबत त्यांची कोणा विरुध्द संसय व तक्रार नसलयाचे सागितले आहे. विचारा दरम्यान दिनांक ०४.१२.२०२२ रोजी श्री तेजस यांचा मृत्यु झाला आहे. पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी पूर्व येथे पंपहाऊस सबवे रुंदीकरणाचे काम सुरु असुन हे काम ५ टप्प्यामध्ये विभागाले आहे. त्यापैकी ३ टप्पे पूर्ण झाले असून दिनांक २५.०८.२०२२ रोजी वाहतूकीस खुले करण्यात आलेले आहे. वाहतूक विभागाची दिनांक २६.१२.२०२२ रोजी टप्पा ४ चे काम सुरु करण्याकरीता ना-हरकत मिळाल्यामुळे सुरक्षेचे योग्य ते नियोजन करुन काम सुरु करण्यात आलेले आहे. सद्यस्थिती उर्वरित टप्प्यांचे काम प्रगतीपथीत आहे. झालेला अपघात हा मोटर सायकलस्वाराच्या गाडीवरील ताबा सुटल्याने झाला आहे.

*********

रोटा - एच - १२७७ (७५०-१-२३)

इतर मागास बहुजन कल्याण विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१०७७

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री.राजकुमार पटेल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१०७७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, मंत्रालय, मुंबई येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागामध्ये, अवर सचिव स्तरावरील एका अधिकाऱ्याने उपसंचालक दर्जाच्या महिला अधिकाऱ्याकडे, त्या काम घेऊन गेल्या असता मला बरे वाटत नाही गाणं म्हणून दाखवा अशी विनंती करुन लज्जा उत्पन्न करणारे हावभाव करुन, उपसंचालक दर्जाच्या महिला अधिकाऱ्याचा अपमान करताना याच विभागाचे उपसचिव यांच्या साक्षीने सदर प्रकार घडल्याचे उघडकीस येणे, विधान परिषदेच्या उपसभापती यांनी या प्रकरणी सखोल चौकशी होईपर्यंत अवर सचिव व उपसचिव दोघांनाही कार्यमुक्त करुन सदर महिलेस न्याय मिळवून द्यावा अशी मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांना विनंती करुन स्वत: या प्रकरणी लक्ष घालण्याची विनंती केली असल्याचे उघडकीस येणे, संबंधित महिलेने संबंधित मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रितसर तक्रार नोंदवूनही त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने उप सभापतींनी आपल्या मागणीत आश्चर्य व्यक्त केल्याचे उघड होणे, शासकीय कार्यालयात महिला कर्मचारी व अधिकाऱ्यांचे होणारे शारिरीक शोषण व विनयभंगाचे वाढलेले प्रमाण, मंत्रालयात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडूनही व महिलेने तक्रार करुनही उच्च पदस्थ त्याची दखल घेत नसल्यामुळे मंत्रालय तसेच शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या राज्यातील हजारो महिला कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मनात न्याय मिळत नसल्याबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

### मा.मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे निवेदन

"सांजवार्ता" या सायंदैनिकात विभागातील उप सचिव तथा संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,पुणे (अतिरिक्त कार्यभार) यांच्या मंत्रालयीन दालनामध्ये दि.२०.१०.२०२२ रोजी घडलेली घटना प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर बातमीनुसार वरिष्ठ महिला अधिकारी यांना मा. मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांच्याकडे कार्यरत असलेले इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अवर सचिव तथा विशेष कार्य अधिकारी यांनी ते बोअर झाले असल्यामुळे (कंटाळा आला असल्याने) त्यांच्याकरिता गाणे म्हणण्याची फर्माईश (विनंती) केली असून, सदर कृती महिला अधिकाऱ्यांप्रती गैरवर्तणूक होत असल्यामुळे संबंधित विशेष कार्य अधिकारी तथा अवर सचिव यांना, तसेच सदर घटना संबंधित उप सचिव तथा संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय यांच्या उपस्थितीत त्यांच्या मंत्रालयीन दालनात घडली असल्याने व उप सचिव तथा संचालक यांनी संबंधित विशेष कार्य अधिकारी तथा अवर सचिव यांना सदर गैरवर्तणूकीच्या संदर्भात समज न दिल्याने, संबंधित अवर सचिव तसेच उप सचिव यांना निलंबित करण्याची संबंधित महिला अधिकारी यांनी मा.मंत्री महोदयांना विनंती

केली असल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. सदर बातमीस अनुसरुन उपसभापती, विधान परिषद यांनी त्यांच्या दि.२९.१०.२०२२ च्या पत्रान्वये संबंधित जबाबदार अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस शासनास केली होती. संबधित पिडीत महिला अधिकारी यांनी देखिल सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्याकडे तक्रार/निवेदन सादर केले होते. सदर तक्रार/निवेदन व उपसभापती, विधान परिषद यांची शिफारस विचारात घेता, दि.०१.११.२०२२ च्या आदेशान्वये संबंधित उपसचिव यांचेकडील संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार काढून अन्य अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

२. संबंधित अवर सचिव तथा विशेष कार्य अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत विविध स्तरांवरून पाठपुरावा करण्यात येत असल्याने, त्यांना मंत्री आस्थापनेवरुन विभागात परत घेऊन, या प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती मा. मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून, मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने संबंधित अवर सचिव यांना दि. ०३.११.२०२२ च्या आदेशान्वये या विभागातून एकतर्फी कार्यमुक्त करून त्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभागांकडे वर्ग करण्यात आल्या होत्या. तथापि, संबंधित महिला अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठपुरावा केल्यानंतर, सामान्य प्रशासन विभागाने दि. २२.११.२०२२ च्या पत्रान्वये संबंधित अवर सचिव यांच्यासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने निदेश दिले होते.

अ) संबंधित अवर सचिव यांना एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आलेले दि. ३.११.२०२२ रोजीचे आदेश रद्द करण्यात यावेत.

आ) कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ नुसार आपल्या विभागात स्थापन केलेल्या अंतर्गत तक्रार समितीमार्फत संबंधित अवर सचिव यांच्याविरूध्दच्या तक्रारीची चौकशी करण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

इ) संबंधित अवर सचिव यांच्याविरूध्द चौकशी नि:पक्षपाती होणे गरजेचे असल्याने, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त निदेशानुसार दि. ०६.१२.२०२२ च्या आदेशान्वये संबंधित अवर सचिव यांचे दि.०३.११.२०२२ चे या विभागातून एकतर्फी कार्यमुक्तीचे आदेश रद्द करून त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते. तसेच दि. ०६.१२.२०२२ च्या आदेशान्वये कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार विभागांतर्गत गठीत करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीकडे संबंधित अवर सचिव यांचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सोपविण्यात आले होते. त्यास अनुसरुन महिला तक्रार निवारण (विशाखा) समितीने दि.०४.०७.२०२३ च्या पत्रान्वये समितीचा चौकशी अहवाल विभागास सादर केला आहे.

४. सदर चौकशी अहवालात संबंधित अवर सचिव यांच्या गैरवर्तणूकीबाबत संबंधित महिला अधिकारी यांनी केलेली तक्रार ही कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध अधिनियम २०२३ या अधिनियमांतर्गत येते किंवा कसे? याबाबत समितीने निष्कर्ष काढलेला नसला, तरी

संबंधित अवर सचिव यांच्या वक्तव्याने तक्रारदार महिला अधिकारी व्यथित झालेल्या असल्याने, भविष्यात कामाच्या ठिकाणी महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांशी वागणूक करताना संबंधित अवर सचिव यांनी दक्षता घेण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.

५. तथापि, संबंधित अवर सचिव यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.०४.२०२३ च्या आदेशान्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात बदलीने पदस्थापना करण्यात आली असल्याने, त्यांना बदली झालेल्या विभागात रुजू होण्यासाठी या विभागातून दि.२८.०४.२०२३ (म.नं) पासून कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत संबंधित अवर सचिव हे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात कार्यरत असल्याने, महिला तक्रार निवारण समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता हा विभाग सक्षम नाही. तसेच, संबंधित अवर सचिव हे गट-अ चे राजपत्रित अधिकारी असून, सदर पदाचे संवर्ग नियंत्रण सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येते. सबब, महिला तक्रार निवारण समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित अवर सचिव यांच्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता सदर प्रकरण सामान्य प्रशासन विभागामार्फत सक्षम प्रशासकीय विभाग म्हणून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास पाठविण्यात आले आहे.

*******

(२८५)

## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १४०

**श्री.छगन भुजबळ,श्री. अजित पवार, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश टोपे मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४० पुढीलप्रमाणे आहे :-**

"शासनाच्या पर्यटन विभागाने दि. ५ डिसेंबर २०२२ व दि.२ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयाअन्वये प्रादेशिक पर्यटन योजनेतील २९२ कोटींच्या कामांची स्थगिती उठवलेली असणे,मात्र येवला शिवसृष्टी या कामाचा सदर स्थगिती उठलेल्या कामांमध्ये समावेश नसणे, त्यामुळे शिवप्रेमींमध्ये संतापाचे व असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे,शासनाने प्रादेशिक पर्यटन योजनेमधील निविदा न काढलेल्या कामांना स्थगिती दिल्याने दि. २९ मार्च २०२२ च्या शासन निर्णयातील रु. ३९९.४० लक्षच्या येवला शिवसृष्टीचे काम स्थगित झाले असणे, या कामाची स्थगिती उठवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दि. ९ ऑगस्ट २०२२, दि. १५ ऑगस्ट २०२२ , दि. २३ ऑगस्ट २०२२ , दि. २९ सप्टेंबर २०२२ , दि. ४ नोव्हेंबर २०२२, दि. ६ नोव्हेंबर २०२२, व दि. ७ नोव्हेंबर २०२२, दि. १६ नोव्हेंबर २०२२, दि. २१ नोव्हेंबर २०२२ व दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास अनेकदा पत्रव्यवहार केला असणे, त्याचप्रमाणे या कामावर यापूर्वी झालेला खर्च आणि हे अर्धवट काम पूर्ण करण्याची गरज लक्षात घेऊन जिल्हाधिकारी नाशिक यांनीसुद्धा दि.०२.०९.२०२२ च्या पत्राअन्वये या कामाची स्थगिती उठवण्यासाठी शासनाला प्रस्ताव सादर केलेला असणे, येवला पंचायत समितीच्या जुन्या जागेवर शिवसृष्टी हा प्रकल्प साकारला जात असणे, या कामासाठी शासन निर्णय क्र. जिपज २०२०/प्र.क्र.१४४/योजना - ११ मुंबई दि. २५ मे,२०२१ अन्वये ७४८६.६० चौ.मी.जागा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असणे, जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेमधील रु. २०० लक्ष निधी मधून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हे काम सन २०२१-२२ मध्ये सुरु झाले असणे, सदर कामाचा वाव अधिक असल्याने संदर्भीय शासन निर्णयानुसार या कामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०२१-२२ मधून रु. ३९९.४० लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करण्यात आलेला असणे,शिवसृष्टीसाठी ७४८६.६० चौ.मी.जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात देऊन जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेतील रु.२०० लक्ष मधून या प्रकल्पाची संरक्षण भिंत,प्रवेशद्वार इ. कामे पूर्ण झाली असणे,उर्वरित रु.३९९.४० लक्ष मधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती ब्रांझ पुतळा, ऐतिहासिक घटनांचे म्यूरल्स, गार्डन,माहितीकेंद्र, उपहारगृह,स्वच्छता गृह इत्यादी प्रस्तावित कामे लवकरात लवकर सुरु होणे गरजचे असणे,अन्यथा रु.२०० लक्ष मधील पूर्ण झालेले काम अर्धवट अवस्थेत पडून राहणार असणे, या कामावर यापूर्वी झालेला खर्च आणि हे अर्धवट काम पूर्ण करण्याची गरज लक्षात घेऊन प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२१-२२ मधील येवला जि.नाशिक येथील निविदास्तरावरील शिवसृष्टी उभारणे या कामाची स्थगिती रद्द करून सदर काम तातडीने सुरु करणेची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.."

### मा.मंत्री, (पर्यटन) यांचे निवेदन

१) प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि. २९.०३.२०२२ अन्वये "येवला येथे शिवसृष्टी उभारणे, ता. येवला या रु.३९९.४० लक्षच्या कामास प्रशासकीय मान्यता देऊन सदर कामासाठी रु.१००.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, नाशिक यांना वितरित करण्यात आला आहे. या कामामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा ब्रॉंझ धातुचा पुतळा, दगडात कोरीव काम केलेले चित्रशिल्प, चौथरा, उद्यान, स्वच्छतागृह, उपाहारगृह, पाणीपुरवठा, मलनिःसारण इत्यादी बाबींचा समावेश आहे.

२) येवला पंचायत समितीच्या मालकीचा सव्हे नं.३८१२ गट क्र.१०० व मधील २८१२.०३ चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड 'शिवसृष्टी' उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.

३) जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ पर्यटनस्थळ विकासासाठी मुलभूत सुविधांकरिता अनुदान (लेखाशिर्ष ३४५२ २८०२) अंतर्गत शिवसृष्टी या कामाशी संबंधित असलेल्या रु. १९९.३८ लक्ष रक्कमेच्या संरक्षण भिंत व अनुषंगिक कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामांसाठी रु. ९९.६९ लक्ष इतका खर्च झाला असून सदर कामे अंतिम टप्यात आहेत.

४) प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत दि. ०१.०४.२०२१ नंतर मंजुरी दिलेल्या कामांपैकी निविदा न काढलेल्या कामांबाबत तसेच ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत, अशा कामांबाबत पुढील आदेशापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, अशा सूचना दि. २५.०७.२०२२ व दि. २८.०७.२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. येवला येथे शिवसृष्टी उभारणे, ता. येवला या कामाची अद्याप निविदा प्रसिद्ध झालेली नाही.

५) येवला येथे शिवसृष्टी उभारणे ता. येवला या कामाची स्थगिती रद्द करुन सदर काम सुरुकरण्यासाठी परवानगी देण्याबाबत श्री. छगन भुजबळ, मा. विधानसभा सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री मा. उपमुख्यमंत्री व मा. मंत्री (पर्यटन) यांना दिलेली निवेदने तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

* * * * *